सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२(२)(३)/२०२०/तेवीस दिनांक : १० मार्च, २०२३.

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

विषय:- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा- २०२०
पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या मुलाखत कार्यक्रमाबाबत.

संदर्भ :- १. जाहिरात क्रमांक २६०/२०२१.
२. आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजीचे प्रसिद्धीपत्रक.

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा - २०२० मधून पोलीस उपनिरीक्षक या संवर्गाच्या शारीरिक चाचणीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची शारीरिक चाचणी महाराष्ट्र पोलीस अकादमी, त्र्यंबकरोड, नाशिक येथे दिनांक ८ ते १७ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत घेण्यात आली.

२. शारीरिक चाचणीसाठी उपस्थित सर्व उमेदवारांनी विहित मानकांनुसार शारीरिक चाचणीमध्ये प्राप्त केलेले गुण आयोगाच्या ऑनलाईन प्रणालीच्या संकेतस्थळावरील संबंधित उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

३. प्रस्तुत शारीरिक चाचणी डिजिटल पद्धतीने प्रथमच घेण्यात आली होती. डिजिटल पद्धतीने विहित मानकांनुसार गुणदान करताना मानकांनुसार मोजमानाच्या आधारे उमेदवारांनी प्रत्यक्ष प्राप्त केलेले गुण त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याच्या आधारे संबंधितांची मुलाखतीसाठी पात्रता निश्चित करण्यात आली आहे.

ठिकाण : मुंबई.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.